|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

जळगाव दि.४ (प्रतिनिधी):- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागात सुरु असलेल्या एम. एड अभ्यासक्रमाच्या ५० जागाकरीता प्रवेश हे केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दि. १५ जून,२०१८ रोजी होणाऱ्या शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे होणार आहे.

सर्व एम. एड. प्रवेश इच्छूक जे विद्यार्थी बी.एड्. उत्तीर्ण वा परीक्षा दिलेले किंवा पदवीसह डी.टी.एड. (D.Ed. with under graduate degree) उत्तीर्ण असतील असे विद्यार्थी ही सी.ई.टी. देण्यास पात्र आहे. प्रवेश इच्छूक उमेदवाराने सामाईक प्रवेश परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरावयाचे असून माहितीपुस्तिका, अर्ज व प्रवेश प्रक्रियेचे विहित शुल्क भरण्याची प्रक्रिया ही दि. २६ मार्च, २०१८ पासून http://www.mahacet.org and http://www.dhepune.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सी. ई. टी अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ७ मे, २०१८ हा आहे.

उमवितील शिक्षणशास्त्र विभागाची एम. एड. प्रवेश प्रक्रिया ही सदरील राज्यस्तरीय एम. एड. प्रवेश प्रक्रियेमार्फतच राबविली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी एम. एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सी.ई. टी. देणे अनिवार्य आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सी.ई.टी. परीक्षेचे ऑनलाईन अर्ज शिक्षणशास्त्र विभागात मोफत भरुन दिले जातील तसेच या संदर्भात मार्गदर्शन वर्गाचे आयोजनही विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात करण्यात येणार आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्र विभागात प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा डॉ. मनिषा इंदाणी दुरध्वनी क्र.०२५७-२२५८४३१, २२५७४३७/९४२१५४२०३६ किंवा डॉ. संतोष खिराडे मो.नं. ९९६०७७२६०४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे या विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

---

जा.क्र: उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : ४ एप्रिल,२०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी